**विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत उद्योग क्षेत्रात काम करणारे पात्र व्यक्तींचे मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक :- संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१४२/उद्योग-६.**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०६ सप्टेंबर, २०२३.

**वाचा :** १) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.२३/२०२३-ERS (Vol.III), दि.२९.०५.२०२३.
२) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४९१.ECI/LET/FUNC/SVEEP-II/VoL/SSR/२०२३, दि.१३.०६.२०२३.
३) अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांचे अर्धशासकीय पत्र क्र.संकीर्ण-२०२३/ प्र.क्र.३८९/२३/३३ दि.२५/०८/२०२३.

**शासन परिपत्रक :-**

भारत निवडणूक आयोगाकडून दरवर्षी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत अस्तित्वात असलेल्या मतदार यादीची पडताळणी व दूरुस्ती करुन ती त्रुटी विरहीत करण्याचा व दि.०१ जानेवारी या अर्हता दिनांकानुसार नविन मतदार नाव नोंदणी करुन मतदार यादी सुधारित करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येतो. भारत निवडणूक आयोगाने दि.२९.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२४ घोषित केलेला आहे.

२. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२४ मध्ये दि.०१ जानेवारी, २०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण करणारे नवमतदार यांची नोंदणी करून मतदार यादी सुधारीत करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. तसेच सन २०२४ या वर्षाच्या दि.०१ जानेवारी, ०१ एप्रिल, ०१ जुलै व ०१ ऑक्टोंबर अशा चार अर्हता दिनांकानुसार वा त्यापुर्वी १८ वर्ष पुर्ण होणाऱ्या नागरीकांना मतदार यादीमध्ये आगाऊ नाव नोंदणी करता येणार आहे. सदर विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दि.१७.१०.२०२३ रोजी राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातील प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत व दि.१७.१०.२०२३ ते दि.३०.११.२०२३ या कालावधीत दावे व हरकती (नाव नोंदणीचे अर्ज) स्विकारण्यात येणार आहेत.

३. विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम, २०२४ अंतर्गत राज्यातील सर्व उद्योग समूह, कंपन्या व संस्था मधील सर्व कर्मचाऱ्यांची मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याचा उपक्रम राबविण्याबाबतची विनंती अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून करण्यात आली आहे.

४. मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व उद्योग समूह, कंपन्या व संस्था यांनी खालील उपक्रम करण्यात यावेत.

१. उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमधील कर्मचारी यांना निवडणूक साक्षरता मंडळामार्फत विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२४ या कार्यक्रमाची माहिती देण्यात यावी.

२. निवडणूक साक्षरता मंडळामार्फत दि.१७.१०.२०२३ ते दि.३०.११.२०२३ या कालावधीत, दि.०१.०१.२०२४ रोजी १८ वर्षे वय पूर्ण होत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून नवीन मतदार म्हणून नोंदणी अर्ज भरुन घेण्यात यावेत.

३. ऑनलाईन माध्यमामार्फत नविन मतदार नोंदणीबाबत विविध उपक्रम राबविण्यात यावे. विविध ऑनलाईन स्पर्धा असे विविध उपक्रम राबवून जनजागृती करण्यात यावी.

४. उद्योग समूह, कंपन्या व संस्थामध्ये नविन मतदार नोंदणीबाबत ऑनलाईन प्रश्न मंजुषा स्पर्धा आयोजित करुन जनजागृती करण्यात यावी.

५. उद्योग समूह, कंपन्या व संस्थांने संबधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय/ तहसिल कार्यालयाकडून आवश्यक अर्जाच्या फॉर्मचे नमुने उपलब्ध करुन घ्यावेत. कर्मचाऱ्यांना विहित नाव नोंदणी अर्ज उद्योग समूह, कंपनी

व संस्थामध्ये उपलब्ध करुन दयावेत. कर्मचाऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या नाव नोंदणींच्या अर्जाचे संकलन करुन उद्योग समूह, कंपनी व संस्थाने संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडे पाठवावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०२३०९०६१५५८३४३५१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR. SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR

Digitally signed by DR. SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C10A1E6C8FBE08C1180978BD3ED8A151ED05202D522B09B9960341C2F080906D, cn=DR. SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2023.09.06 16:00:03 +05'30'

**( डॉ. श्रीकांत ल. पुलकुंडवार )**
**उप सचिव (उद्योग व प्रशासन), महाराष्ट्र शासन**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे प्रधान सचिव.
३. मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे खाजगी सचिव.
४. मा.मंत्री / मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे खाजगी सचिव.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे वरीष्ठ स्विय सहायक.
६. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे स्विय सहायक
७. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मर्या., मुंबई.
९. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या., मुंबई.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, वर्धा रोड, नागपूर.
१३. संचालक, भूविज्ञान व खनीकर्म संचालनालय, २७ खनीज भवन, शिवाजीनगर, नागपूर.
१४. संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, चर्नीरोड, मुंबई.
१५. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सर्व जिल्हे, महाराष्ट्र राज्य.
१६. कार्यासन संग्रहार्थ उद्योग-६.